## स्वच्छ सर्वेक्षणात जिल्ह्यातील १४ नगरपालिकांना 'ओडीएफ प्लस प्लस'चा दर्जा

# अमळनेर पालिका राज्यात ५ वी

\ **जळगाव, (वा.)** केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाच्या वतीने देश पातळीवर घेण्यात आलेल्या 'स्वच्छ सर्वेक्षण २०२३' या स्पर्धेचा निकाल जाहीर झाला आहे. यात जळगाव जिल्ह्यातील नगरपालिकांच्या कामगिरीत मागील वर्षापेक्षा सुधारणा झाली आहे.

विभागात अमळनेर पालिका प्रथम क्रमांकावर

स्वच्छ सर्वेक्षण २०२३ निकाल जाहीर झाला असून अमळनेर नगरपरिषद ला ५० ते १ लाख लोकसंख्येच्या श्रेणीतून झोनल रँकिंग मध्ये ९ वा क्रमांक तर राज्य क्रमवारीमध्ये ५ वा क्रमांक प्राप्त केला आहे. प्रथम लोणावळा, द्वितीय कऱ्हाड, तृतीय सिल्लोड, चौथ्या नंबरवर उमरेड, तर पाचवा क्रमांक अमळनेर नगरपरिषदेला मिळाला आहे. विभागीय रँकिंगमध्ये अमळनेर प्रथम क्रमांकावर तर जिल्हा क्रमवारीमध्ये ही प्रथम आली आहे. राष्ट्रीय रँकिंग १०४ असून अमळनेर नगरपरिषदने ६ हजार ८९६. ८५गुण प्राप्त केले आहेत.




### ओडीएफ प्लस व ओडीएफ प्लस प्लस म्हणजे काय?

स्वच्छ सर्वेक्षण निकालात जिल्ह्यातील १४ नगरपालिकांना ओडीएफ प्लस प्लसचा दर्जा मिळाला आहे. ओडीएफ म्हणजे ही शहरे उघड्यावरील शौचालयापासून मुक्त आहेत. ओडीएफ प्लस म्हणजे ही शहरे फक्त उघड्यावरील शौचालयापासून मुक्त नसून या शहरात स्वच्छ सार्वजनिक स्वच्छतागृह पण आहेत. ओडीएफ प्लस प्लस म्हणजे या शहरांमध्ये FSTP- एफएसटीपी (फेकल स्लज ट्रीटमेंट प्लांट) मलनिस्सारण प्रकल्प कार्यान्वित आहेत. याठिकाणी सांडपाण्यावर नियमित प्रक्रिया केली जाते.

### १४ पालिकेत सुधारणा

- स्वच्छता सर्वेक्षण कामगिरीत सुधारणा झाली आहे. पुढील वर्षी नगरपालिकांच्या कामगिरीत अजून सुधारणा होण्यासाठी निकालाचे नगरपालिकानिहाय विश्लेषण केले जाईल. यानुसार सखोल नियोजन आराखडा तयार करून आवश्यक निधी व मनुष्यबळ प्रत्येक नगरपालिकेला उपलब्ध करून दिले जाईल.
- एक वर्ष प्रचंड मेहनत घेऊन पुढील वर्षी चांगला निकाल लागेल, यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत," अशी प्रतिक्रिया जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी व्यक्त केली आहे.
- नगरपालिकांमध्ये पायभूत सुविधांची निर्मिती करण्यात येत आहे.नागरिकांनी ही स्वच्छता मोहिमेत आपला सहभाग नोंदवावा. असे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.
- नगरपालिकांमध्ये झालेल्या सुधारणांसाठी नागरिक, सफाई कामगार व मुख्याधिकाऱ्यांचे अभिनंदन ही त्यांनी केले आहे.

"गेल्या वर्षापेक्षा यंदा आम्ही स्वच्छता मोहीम अधिक जोमाने राबवल्यामुळेच अमळनेर नगरपालिका विभागात प्रथम तर राज्यात ५ व्या क्रमांकावर आली. नागरिकांनी स्वच्छता मोहिमेत आपला सहभाग नांदवल्यामुळेच आम्ही स्वच्छ सर्वेक्षणात राज्यात ५ वा क्रमांक मिळवला. यंदा अजून जास्त मेहनत घेऊन दर्जा अधिक उंचावण्यासाठी प्रयत्न करणार आहोत."

**- प्रशांत सरोदे**, मुख्याधिकारी, नगरपालिका, अमळनेर

### या १४ पालिकांना मिळाला ओडीएफ प्लस प्लसचा दर्जा

जिल्ह्यातील भुसावळ, चाळीसगाव, चोपडा, अमळनेर, भडगाव, धरणगाव, एरंडोल, फैजपूर, पाचोरा, सावदा, यावल, पारोळा, रावेर व वरणगाव या नगरपालिकांना ओडईएफ प्लस प्लसचा दर्जा मिळाला आहे. अशी माहिती सहायक आयुक्त (नगरपालिका) जनार्दन पवार यांनी दिली आहे.

# कब्रस्तान, इदगाह ट्रस्टच्या निवडणुका

## वक्फ बोर्डाच्या देखरेखीखाली व्हाव्यात : अहमद सर

\ **जळगाव, (वा.)** येथील मुस्लिम कब्रस्तान व ईदगाह ट्रस्टची सार्वत्रिक निवडणूक २०२४ औपचारिकतेसह पूर्ण करण्यासाठी वक्फ बोर्डाचे प्रतिनिधी आणि जळगाव स्तरावरील नियुक्त निवडणूक अधिकारी यांनी संबंधित सर्व तोंडी व लेखी आदेश व घोषणा प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. जी वक्फ बोर्ड कायदा आणि जळगाव ट्रस्टच्या उपनियमांनुसार असावी. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ट्रस्टच्या कोणत्याही पदाधिकाऱ्याला ईदगाह ट्रस्ट कार्यालयातील निवडणुकीच्या कामात हस्तक्षेप करण्यास मनाई करण्यात यावी, जेणेकरुन ही सर्वसाधारण सभेची निवडणूक सुरळीतपणे पार पडेल. सध्या निवडणूक कार्यालयातील सर्व कामे ट्रस्टच्या मोजक्या विश्वस्तांच्या देखरेखीखाली व सूचनेनुसार होत असल्याचे दिसून येत आहे, हे अजिबात योग्य नाही. निवडणुकीच्या काळात कार्यालयीन कामकाजासाठी तीन नियमित लिपिक आणि एक शिपाई तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त करण्यात यावे, जे केवळ वक्फ बोर्ड निरीक्षक आणि निवडणूक अधिकारी यांना जबाबदार असतील. या लोकांचा मानधन सभासदत्वासाठी जमा झालेल्या फीमधून देण्यात यावी. १९९६ ची मुस्लिम लोकसंख्या आणि आजची २०२४ ची मुस्लिम लोकसंख्या मध्य लक्षणीय वाढली असल्याने होणाऱ्या या निवडणुकीत जळगाव शहरातील सर्व मुस्लिम वस्त्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात यावे.




### निवडणुका पारदर्शक व्हाव्यात

या निवडणुकीत वॉर्डांची संख्या १५ वरून १९ पर्यंत वाढवावी, गरज भासल्यास मुस्लिम लोकसंख्या असलेल्या मोठ्या वस्त्यांना न्याय देऊन २/३ वॉर्ड वाढवता येतील. वक्फ बोर्डाने दाखल केलेल्या लेखी अपीलचा पूर्ण विचार करून जळगाव मुस्लिम कब्रस्तान व ईदगाह ट्रस्टची सार्वत्रिक निवडणूक पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी ट्रस्ट व जनता या दोघांनाही मदत होईल, अशी आशा आहे.

**दखल ● महानगरपालिका आयुक्तांनी कर्मचाऱ्यांना दिली नववर्षाची भेट; शब्द पाळला**

# ७८८ कर्मचाऱ्यांना सातवा आयोग लागू

\ **जळगाव, (वा.)** महापालिकेतील ७८८ कार्यरत कर्मचाऱ्यांच्या डिसेंबर महिन्याच्या वेतनात सातवा वेतन आयोग लागू करण्यात येणार आहे. त्यांचा पगार २ ते ३ दिवसात होणार असल्याचे मनपा सूत्रांनी सांगितले. त्यात ९३ कार्यरत उड्डाण पदोन्नतीधारक कर्मचारी वगळण्यात आले आहे. उर्वरित कर्मचाऱ्यांचे वेतन करण्यात येणार आहे.

महापालिका आयुक्त डॉ.विद्या गायकवाड यांनी नववर्षात ही सक्रांत भेट दिली आहे. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना सातवा वेतन



आयोग लागू करण्याचा विषय रखडला होता. तो आता मार्गी लागला आहे. डिसेंबर २०२३ च्या वेतनात सातवा वेतन आयोग लागू करून पगार केले जाणार आहेत. त्यामुळे मनपा कर्मचाऱ्यांचे डिसेंबर २०२३चे वेतन थांबविण्यात आले होते.

### डिसेंबरचा पगार २ दिवसात होईल जमा

प्रशासनाकडून दोन दिवसात सातवा वेतन आयोग लागू करून पगार कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याची कार्यवाही पालिका स्तरावर सुरू आहे. त्यामुळे शुक्रवार (ता.१२ ) किंवा सोमवारी(ता.१५) रोजी कर्मचाऱ्यांच्या खात्यात वेतन जमा होईल, अशी माहिती मनपा प्रशासनाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे महापालिकेचे कर्मचारी आनंदात असल्याचे दिसून आले.

### उड्डाण पदोन्नती धारकांनाही लाभ

तत्कालीन नगरपालिकेने ३७८ कर्मचाऱ्यांना उड्डाण पदोन्नत्या दिल्या होत्या. त्यापैकी ३९ कर्मचारी मयत असून २४६ कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. यामध्ये उड्डाण पदोन्नतीधारक ९३ कार्यरत कर्मचाऱ्यांना वगळण्यात येणार आहे. सदर ९३ कर्मचाऱ्यांना जानेवारी अखेरपर्यंत सातवा वेतन आयोग लागू करून त्यांचे पगार करण्यात येतील, असेही मनपाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

# अंनिसची नूतन कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी मंगलसिंग पाटील तर कार्याध्यक्षपदी सुनील पिंपळे

\ **तळोदा, (वा.)** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या तळोदा शाखेचे नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी मंगलसिंग पाटील यांची तर कार्याध्यक्षपदी प्रा सुनील पिंपळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.





अनिसाच्या तळोदा शाखा कार्यकारणीचा कार्यकाळ संपल्याने नूतन कार्यकारणी गठीत करण्यासाठी नुकतीच जिल्ह्या उपाध्यक्ष डॉ.देविदास शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारणी निवड बैठक घेण्यात आली या बैठकीला निरीक्षक म्हणून वैज्ञानिक जाणिवा विभाग जिल्हा कार्यवाह मुकेश कापुरे व जाती अंत संकल्प विभाग जिल्हा कार्यवाह प्रा.प्रशांत बोबडे होते. बैठकीत मावळते कार्याध्यक्ष प्रा.मुकेश जावळे यांनी वर्षभरातील तळोदा शाखेचा कामकाजाच्या अहवाल व आढावा मांडला. बैठकीत सर्वानुमते पुढील वर्षभरासाठी नूतन कार्यकारिणी गठित करण्यात आली. तळोदा शाखेच्या अध्यक्षपदी मंगलसिंग मदन पाटील (रा.गणेश बुधावल) यांची तर उपाध्यक्षपदी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते दादाभाई ढोडरे, तारा मराठे व प्रा. जयपालसिंह शिंदे यांची निवड करण्यात आली. कार्याध्यक्षपदी प्रा सुनिल पिंपळे यांची तर प्रधान सचिव म्हणून अमोल पाटोळे यांची निवड करण्यात आली आहे.उर्वरित कार्यकारणीत बुवाबाजी संघर्ष विभाग कार्यवाह सिद्धेश्वर गायकवाड,विविध उपक्रम विभाग कार्यवाह प्रा मुकेश जावरे, रमेश राऊत मेघश्याम धनगर,महिला जयश्री महाले,युवा आदी उपस्थित होते.

**# QUICK NEWS**

### आदित्य दांडेकर सीए परीक्षा उत्तीर्ण



\ **जळगाव, (वा.)** : जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.च्या अनुभूती इंग्लीश मिडियम स्कूलचे जनसंपर्क अधिकारी मनोज दांडेकर यांचे चिरंजीव आदित्य याने सीए परीक्षा उत्तीर्ण केली. दी इंस्टीट्युट ऑफ चार्टर्ड अकौऊंट ऑफ इंडियामार्फत नोव्हेंबर २०२३ मध्ये सीएची अंतिम परीक्षा घेण्यात आली होती. त्याच्या या यशाबद्दल जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, सहव्यवस्थापकीय संचालक अतुल जैन यांच्यासह सहकाऱ्यांनी कौतुक केले आहे. अथक परिश्रमाचे चीज झाल्याचे समाधान पालकांनी व्यक्त केले.

### अनुराधा खैरनार सी.ए. परीक्षा उत्तीर्ण



\ **जळगाव, (वा.)** : दि इनस्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट ऑफ इंडिया, नवी दिल्ली या संस्थेद्वारा नोव्हेंबर २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या सीए फायनल परीक्षेत जळगाव येथील कु.अनुराधा रविंद्र खैरनार हिने घवघवीत यश संपादन केले. त्यामुळे तिचे परिसरात मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे. अनुराधा ही प्रसिद्ध सी.ए. डॉ. रविंद्र खैरनार यांची कन्या आहे. तिला प्रा.सी.ए. यशवंत सेंदाने आणि सी.ए. करण काबरा यांनी मार्गदर्शन केले.

### पोस्टर्स स्पर्धेत दिव्या मगरे, कल्याणी प्रथम

\ **शिंदखेडा, (वा.)** : येथील एम. एच. एस. एस. कनिष्ठ महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त कर्तृत्ववान महिला या विषयावर पोस्टर्स स्पर्धा घेण्यात आली. यात प्रथम क्रमांक दिव्या मगरे व कल्याणी शिंदे, द्वितीय साक्षी पाटोळे व तृतीय क्रमांक साक्षी गणेश भदाणे यांनी प्राप्त केला. विजेत्या विद्यार्थिनींना संस्थेचे जेष्ठ संचालक यशवंत वंजी पवार यांच्या पुण्य स्मरण पित्यर्थ संचालक मोतीलाल पवार यांच्याकडून २५१, १५१व शंभर रुपयाचे रोख बक्षीस संस्थेचे अध्यक्ष स्वप्नील देसले,सचिव आनंदा चौधरी व प्राचार्य टी.एन.पाटील यांच्य हस्ते देण्यात आले.

# शनिपेठेत घरोघरी पोहोचवले निमंत्रण

## श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळयानिमित्त अक्षदा वाटप



\ **जळगाव, (वा.)** संपूर्ण देशभरात सध्या श्रीराम मंदिर स्थापनेचा उत्सव साजरा केला जात आहे. अयोध्या येथे दि.२२ जानेवारी रोजी श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठापना उत्सव साजरा केला जाणार असल्याने जळगावातील शानिपेठ परिसरातील संकल्प महिला मंडळातर्फे घरोघर अक्षदा वितरण करण्यात आले. प्रभू श्रीरामचंद्र यांच्या जयघोषात अक्षदा आणि माहिती पुस्तिकेचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी महिलांची संख्या लक्षणीय होती. शहरातील शनिपेठेत असलेल्या जय श्रीराम मित्र मंडळ आणि संकल्प महिला मंडळातर्फे अयोध्या येथून आलेल्या मंत्रित अक्षदांचे परिसरात वितरण करण्यात आले. मुख्य चौकात माजी होमगार्ड समादेशक रमेश दलाल यांच्या हस्ते प्रभू श्रीरामचंद्र यांच्या प्रतिमेचे पूजन आणि आरती करून अक्षदा वाटपाला वाजत गाजत सुरुवात करण्यात आली. घरोघरी जाऊन अक्षदा आणि माहिती पुस्तिका देऊन सर्वांना दि.२२ जानेवारी रोजी होणारा श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळयाचा आनंदोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले.

शनिपेठेत दररोज आनंदोत्सव साजरा केला जाणार असून दि.२२ रोजी मुख्य चौकात सकाळपासून धार्मिक कार्यक्रम आणि भजनचे आयोजन केले जाणार आहे. परिसरातील सर्व भाविकांना अक्षदा निमंत्रण देताना उपक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले. प्रसंगी संकल्प महिला मंडळाच्या राजकुमारी उपाध्ये, छाया चौधरी, शीतल जोशी, वंदना शिंदे, हेतल पाटील, श्वेता देवरे, काजल चौधरी, यांच्यासह राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमोद निकुंभ, पराग महाशब्दे, राजेंद्र उपाध्ये, संजय शिंदे, मोहित प्रजापती, जितेंद्र माळी, चेतन वाणी, मयूर चौधरी, विजय देवरे, रोहित जोशी, गौरव चौधरी, देवेंद्र चौधरी, निखील जोशी, कुणाल कांकरिया, साहिल जोशी, आदींसह मंडळाचे इतर भाविक उपस्थित होते.

# 'द बस ड्रायव्हर ग्रुप'ची निदर्शने

## हिट अँड रन कायद्याविरोधात पुन्हा आंदोलनाचा इशारा



\ **धुळे, (वा.)** केंद्र शासनाच्या हिट अँण्ड रन कायद्याविरोधात आज द बस ड्रायव्हर ग्रुपतर्फे जोरदार निदर्शने करीत शासनाचे लक्ष वेधण्यात आले. याबाबत प्रशासनाला निवेदन देवून हा नवीन कायदा व त्या कायद्याला अनुसरुन दंडाबाबत योग्य तो निर्णय घ्यावा. अन्यथा अनेक संघटना रस्त्यावर उतरुन आंदोलन करतील, असा इशाराही यावेळी देण्यात आले. केंद्र शासनाने ३० डिसेंबर २०२३ रोजी भा.दं.वि. कलम २७९ (हिट अँण्ड रन) बाबतचा घेतलेला निर्णय हा पुर्णतः एकतर्फी असुन तो ड्रायव्हर संघटनांवर अन्यायकारक आहे. या बदलाबाबत सरकारने कुठल्याही संघटना, अध्यक्ष किंवा पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता एकतर्फी निर्णय घेतला आहे. वास्तविक कुठलाही ड्रायव्हर हा अपघात स्वतःहुन कधीच करत नसतो. अपघात होण्यास अनेक कारणे असु शकतात. परंतु त्यात फक्त ड्रायव्हरला दोषी ठरविणे हे पुर्णतः चुकीचे असुन या कायद्याबाबत घेतलेला एकतर्फी निर्णय आमच्या संघटनांना मान्य नाही. तरी ड्रायव्हरांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांच्यावरील अन्याय दूर करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. आंदोलनात संघटनेचे सुरेश पाटील, निजाम शेख, योगेश्वर पाटील, समाधान पाटील, विशाल जमदाडे, भैय्या पाटील, पप्पु थोरात, दत्तराज पदमर, भैय्या चौधरी, आनंद माळी, सिध्दांत विरकर, संजय कासारंसह ड्रायव्हर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# कोंबिंग ऑपरेशनमध्ये ७२ जणांविरूद्ध कारवाई

\ **धुळे, (वा.)** पंतप्रधानांच्या नाशिक दौऱ्याच्या अनुषंगाने जिल्ह्यात नाकाबंदी अर्थात कोंबिंग ऑपरेशन दरम्यान 72 जणांविरूद्ध कारवाई करून त्यांच्याकडून ४२ हजार ८०० रूपयाचां मुद्देमाल जप्त केला. १० जानेवारी रोजी १० ते ११ जानेवारी रोजी रात्री २ वाजेपर्यंत जिल्ह्यात कोंबिंग ऑपरेशन करण्यात आले,अशी माहिती जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिली.पंतप्रधान यांच्या नाशिक दौऱ्याच्या अनुषंगाने जिल्हा पोलीस अधिक्षकांनी २५ अधिकारी व १०२ पोलीस अंमलदारांची नेमणूक करून २६ ठिकाणी तपासणी केली. यात ९०० चार चाकी व दुचाकी वाहने तसेच १०४ हॉटेल, लॉजेस आणि गेस्टहाऊची तपासणी झाली. २१ सराईत गुन्हेगारांची तपासणी करण्यात आली असून दारूबंदीच्या ३ केसेस करण्यात आल्या आहेत. दारू बंदी कायद्यान्वये झालेल्या कारवाईत ६ हजार ४७० रूपयांचा मुद्देमाल जप्त केलेआहे.

# युवा अश्वमेधतर्फे बॅगवाटप




\ **रावेर, (वा.)** तालुक्यातील शिंदखेडे गावातील जि.प शाळेतील १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना स्कूल बॅग आणि किट वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी सेवा सहयोग फाउंडेशन यांनी युवा अश्वमेध प्रतिष्ठानचे तुषार महाजन यांच्या मदतीने शिंदखेडे ता. रावेर गावातील जि.प शाळेतील ७० विद्यार्थ्यांना शालेय स्कूल बॅग आणि किट उपलब्ध करून दिल्या. स्कूल बॅग आणि किट वाटप प्रसंगी अल्फा कॉम्प्युटरचे संचालक श्री शिरीष पाटील सर प्रमुख पाहुणे तर गावातील सुनील सुखदेव पाटील अध्यक्ष शा. व्यव. समिती पांडुरंग ओंकार चौधरी, मुरलीधर पाटील, निंबा पाटील, वैभव महाजन, संतोष पाटील, कामिनी पाटील,मनिषा पाटील, अर्चना सुतार,ममता पाटील उपस्थित होते. मुख्याध्यापक अनिल सपकाळे, उपशिक्षिका जयश्री धांडे वं चंद्रकांत राऊत गुरुजी यांनी परिश्रम घेतले.


**निवारा होम फायनान्स लिमिटेड** nivara

**कॉर्पोरेट कार्यालय :** क्र. २२, २३, २४, २५/१०१/३, ३ रा मजला, बीएनआर कॉम्प्लेक्स, श्री राम लेआऊट, जे. पी. नगर, ७ वा फेज, आरबीआय लेआऊटच्या समोर, बेंगळुरू, कर्नाटक-५६००७८.

**ताबा सूचना परिशिष्ट ४ (नियम ८ (१) पाहा) स्थावर मालमत्तेकरिता**

ज्याअर्थी, अधोहस्ताक्षरितांनी **निवारा होम फायनान्स लिमिटेडचे** प्राधिकृत अधिकारी म्हणून, सीक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे अनुच्छेद १३ (१२) सहवाचन नियम ९ अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये **कर्जदार श्री. संतोष लक्ष्मण कटकडे व सहकर्जदार शारदा संतोष कटकडे, अशोक लक्ष्मण कटकडे, अर्चना अशोक कटकडे, अजीनाथ फकीरचंद** यांना सूचनेत निर्देशित रक्कम **दि. ०६.११.२०२३** रोजीनुसार **रु. ५,७२,७४९.०० (रु. पाच लाख बाहत्तर हजार सातशे एकोणपन्नास मात्र)** अधिक दि. ०७.११.२०२३ पासून संपूर्ण प्रदानाच्या तारखेपर्यंत दरसाल १८% दराने पुढील व्याज रकमेचे प्रदान सदर सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्याचे निर्देश देणारी मागणी सूचना दि. ०७.११.२०२३ जारी केली होती. कर्जदार व हमीदारांनी सदर रकमेचे प्रदान केले नसल्याने याद्वारे कर्जदार व सहकर्जदार तसेच सर्वसामान्य जनतेस सूचना देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सदर कायद्याचे अनुच्छेद १३ (४) सहवाचन सदर नियमाच्या नियम ९ अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा **दि. १०.०१.२०२४** रोजी ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार व सहकर्जदारांना तसेच सर्वसामान्य जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्ता व कोणत्याही मालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे **निवारा होम फायनान्स लि. यांच्या प्रभारांतर्गत दि. ०६.११.२०२३ रोजीनुसार रु. ५,७२,७४९.०० (रु. पाच लाख बाहत्तर हजार सातशे एकोणपन्नास मात्र) अधिक दि. ०७.११.२०२३ पासून संपूर्ण प्रदानाच्या तारखेपर्यंत दरसाल १८% दराने पुढील व्याज रकमेच्या अधीन असतील.**

**स्थावर मालमत्तेचे विवरण : १) कॉर्पोरेशन : सिन्नर अन्य तपशील – इमारतीचे नाव – कानडी मळा, फ्लॅट क्र १७८ (१७४), रस्ता : सिन्नर, ब्लॉक सेक्टर : सिन्नर, लँडमार्क : सर्व्हे क्र. १७८ (१७४). १) खुले क्षेत्र : १००.०० चौरस मीटर.**

ठिकाण : नाशिक
दिनांक : १२.०१.२०२४

सही/– प्राधिकृत अधिकारी
निवारा होम फायनान्स लि.


**आरामदायी • सुरक्षित प्रवास म्हणजे राज्य परिवहनच्या एसटी बसेस : तहसीलदार कापसे**

# रावेर बसस्थानकात सुरक्षित अभियान सप्ताह

\ **जळगाव, (वा.)** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ जळगाव विभागांतर्गत रावेर बसस्थानकात सुरक्षित अभियान सप्ताहास प्रारंभ करण्यात आला आहे.

रावेर तहसीलदार बंडू कापसे यांच्या हस्ते या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आगार व्यवस्थापक विजय पाटील होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ पत्रकार दीपक नगरे, विभागीय लेखाधिकारी मिलिंद सांगळे, स्थानक प्रमुख संदिप तायडे, वाहतूक निरीक्षक जयेश लोहार, वाहतूक नियंत्रक एस. के. शेख हे उपस्थित होते.




### यांनी मांडला आगाराचा लेखा-जोखा

अध्यक्षीय भाषणात आगार व्यवस्थापक श्री पाटील यांनी रावेर आगाराचा लेखा जोखा सांगत शासनाचे धोरण कर्मचाऱ्यांची भूमिका व प्रवाशाचे कर्तव्य या विषयावर प्रकाशझोत टाकला. कार्यक्रम यशस्वितेसाठी योगेश जोशी, मनवर तडवी, लिपीक संजय तडवी , सुरेखा तायडे, कोकिळा काळे, सदानंद महाजन, निलेश वाणी, डी. के. पाटील यांच्यासह कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक संदीप तायडे यांनी केले.

### बस प्रवास म्हणजे सुरक्षिततेची हमी- बंडू कापसे

- तहसीलदार बंडू कापसे यांनी सांगितले की, रावेर बसस्थानक येथील कार्यक्रमात आल्यानंतर जुन्या काळातील म्हणजेच शैक्षणिक काळातील शालेय जीवनातील आठवणी जाग्या झाल्या. आजही प्रवास करण्यासाठी ग्रामीण भागातील नागरिकांची व विद्यार्थ्यांची पहिली पसंत ही राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसचीच आहे. बसने प्रवास म्हणजे सुरक्षिततेची हमी, असे प्रवासी आजही समजतात.
- प्रवासी वाहतूक करत असताना चालक व वाहक यांनी आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवावी. प्रवाशांसोबतच आपल्या कुटुंबाचे भान देखील ठेवणे आवश्यक आहे. वाहन चालवत असताना कुठल्याही प्रकारचे व्यसन करू नये अथवा मोबाईलवर बोलू नये, बस दुरुस्ती करताना कुठलाही हलगर्जीपणा न करता मी माझी गाडी दुरुस्त करीत आहे, अशी भावना मनात ठेवावी. सर्व कर्मचाऱ्यांनी प्रवासी हित जोपासून आपापल्या जबाबदारीचे पालन करावे. अनेक कर्मचारी बसच्या हितासाठी मनापासून सेवा बजावत असतात.


AMBIT Finvest — Pragati ke partner

**AMBIT FINVEST PRIVATE LIMITED**

**कॉर्पोरेट कार्यालय :** कनकिया वॉल स्ट्रीट, ५ वा मजला, ए ५०६ - ५१०, अंधेरी - कुर्ला मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३.

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव जाहीर सूचना**

सीक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ सहवाचन सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ व ९ अंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्रीकरिता १५ दिवसांची ई-लिलाव विक्री सूचना

आम जनतेस तसेच विशेषत: कर्जदारांना व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, प्रतिभूत धनकोंकडे स्थावर मालमत्ता गहाण/प्रभारित खालील निर्देशित स्थावर मालमत्ता जिचा ताबा **अॅम्बीट फिनवेस्ट प्रायव्हेट लिमिटेड,** प्रतिभूत धनको यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे घेण्यात आला आहे त्या मालमत्तेची अॅम्बीट फिनवेस्ट प्रायव्हेट लिमिटेड यांना खालील निर्देशित संबंधित कर्जदार व हमीदारांकडून देय रक्कम त्यावरील पुढील व्याज व इतर खर्च आदीच्या वसुलीसाठी **जशी आहे जेथे आहे, जी काही आहे तेथे आहे व विना अडथळा तत्त्वावर** खाली दिलेल्या तारीख व वेळेत विक्री करण्यात येत आहे. राखीव मूल्य व इसारा रक्कम ठेव (इरठे) खालीलप्रमाणे नमूद आहे.

| कर्जदार/हमीदार/कर्जाचे खाते | मागणी सूचना दिनांक व रक्कम | स्थावर मालमत्तेचे विवरण | राखीव मूल्य, इरठे व इरठे सादरीकरणाची अंतिम तारीख | ई-लिलावाची तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|
| १. शुभ सरस्वती बहुउद्देशीय सहकारी संस्था मर्यादित २. योगेश जगन्नाथ पगार, ३. जगन्नाथ विष्णू पगार. एलएएन नं. : एनएसके००००००१२१२६ २. एनएसके०००००००१५४२२ | दि. १६.११.२०२१ दि. ११.११.२०२१ रोजीनुसार रु, ३७,८३,८२२.०० (रु. सदतीस लाख त्र्याऐंशी हजार आठशे बावीस मात्र) अधिक संपूर्ण प्रदानाच्या तारखेपर्यंत पुढील व्याज. | पुढील विवरणीत मालमत्तेचा सर्व तो भाग व भूखंड : शाळा इमारत – गट क्र.५६१/१ पार्ट वरी, खडकजांब ता. चांदवड, जि. नाशिक, चांदवड, महाराष्ट्र, पिनकोड – ४२३११७. सीमा : उत्तरेस – गट क्र. ५५९, पूर्वेस : गोरठण रोड, पश्चिमेस : आग्रा रोड, दक्षिणेस : अन्य जमीन. | राखीव मूल्य : रु. ८८,०३,८२०.०० (रु. अठ्ठ्याऐंशी लाख तीन हजार आठशे वीस मात्र) इरठे : रु. ८,८०,३८२.०० (रु. आठ लाख ऐंशी हजार तीनशे ब्याऐंशी मात्र) इरठे जमा करण्याचा अंतिम दिनांक : २४.०२.२०२४ | दि. २६.०२.२०२४ रोजी स ११.०० ते दु. १.०० ((प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादीत विस्तारासह) |

मे. ई-प्रोक्युअरमेंट टेक्नोलॉजी लिमिटेड द्वारे वेबसाइट https://ambitfinvest.auctiontiger.net वर ऑनलाइन ई-लिलाव केला जाईल. विक्रीच्या नियम व अटींची माहितीकरिता, कृपया मे. ई-प्रोक्युअरमेंट टेक्नोलॉजी लिमिटेड (ऑक्शन टायगर) (हेल्पलाईन क्र. लॅन्डलाईन- ७९-६८१३६८८०/८८१/८३७/८४२, दूर. क्र. ९२६५५६२८१८/९२६५५६२८२१/९२६५५६२८१९ वर संपर्क करा. संपर्क व्यक्ती : श्री. राम शर्मा, ई-मेल आयडी : ramprasad@auctiontige.net वा लिंक https://ambitfinvest.auctiontiger.net वर भेट द्यावी.

अधिक माहितीकरिता, अॅम्बिट फिनवेस्ट प्रायव्हेट लिमिटेडचे श्री. प्रशांत ओहळ, वरिष्ठ व्यवस्थापक, मोबाईल क्र. ९९८७५८०५१५, ई-मेल आयडी : prashant.ohal@ambit.co व श्री. श्री. अझीम अजीज शेख, ब्रॅन्च कलेक्शन मॅनेजर, मोबा. नं. ७७०९६९९९९५, ई-मेल आयडी azim.shaikh@amibt.co वर संपर्क करा.

दिनांक : १२.०१.२०२४
ठिकाण : नाशिक

सही/–
प्राधिकृत अधिकारी, अॅम्बिट फिनवेस्ट प्रायव्हेट लिमिटेड